REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

'अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष ११ पुणें, बुधवार तारीख ३१ जानेवारी, १९४५ अंक ५




व्ही. पी. बेडेकर
आणि सन्स लि.
मुंबई.
मसाल्याचे व्यापारी
पुणें एजंट:—
द. ना. हेजीब

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध
**ढेकणांच्या उदबत्त्या**
(ABC)
**BUG COILS ( ABC )**
प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत. विशिष्ट धुरामुळें हा चमत्कार होतो. बॉक्समध्यें १२ तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें बॉक्स किं. रु. १।०८, ट. ख. निराळा.
दि मागोरा केमिकल कं. लि.,
हिराबाग, पुणें २




गेल्या ३० वर्षांत हजारो लोकांनीं अनुभवलेले
**फिव्हर एस.**
सर्व तऱ्हेच्या तापावर अप्रतिम गुणकारी. किं. रु. १
● होमिओ लॅक्स—विन त्रासानें शौच शुद्धि करून, कोठा साफ व निर्दोष करणारें, किं. १ रु. पाकीट ०।≈
● बाल मित्र—लहान मुलांना उद्भवणाऱ्या सर्व विकारांवर खात्रीचा उपाय, किं. रु. २
पॅकिंग व पोस्टेज खर्च निराळा पडेल.
तुमच्या नजीकच्या दुकानांत वरील औषधें मागा. तें अधिक फायद्याचें आहे.
एजन्सी नसलेल्या गांवीं स्टॉकिस्ट नेमणें आहेत.
सुधा एजन्सी,
१८ खांडके बिल्डिंग, दादर, मुंबई नं. १४.

**सांडू हार्टिना**
छातींत धडधडणें, धाप लागणें, छातींत कळ अगर चमक मारणें, रक्ताचा दाब वाढणें व हृदयाची क्रियेच्या दोषांवर खास गुणकारी.
ओ रि जि न ल
ब्राम्ही तेलाचे
कारखानदार.
द. कृ. सांडू ब्रदर्स, चेंबूर, लिमिटेड.
मॅन्यु. केमिस्ट्स व ड्रगिस्ट्स.
चेंबूर, मुंबई.

पुणें चीफ एजंट :
मे. श्रीदत्त एजन्सी
१०० रविवार पेठ,
मोती चौक, पुणें २.

कोल्हापूर विक्रेते :
मे. भागवत आणि कं.
कांच लाइन

सातारा जिल्हा एजंट :
मे. जोशी आणि मंडळी
भवानी पेठ.

## विविध माहिती

**म्हैसूर चेंबरचे महाराष्ट्रीय प्रतिनिधी**

म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे फेडरेशन ऑफ चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या येत्या अधिवेशनास उपस्थित रहाण्याकरितां निवडलेल्या प्रतिनिधींत श्री. नारायणराव नाईक व श्री. शंकरराव ओगले हीं नांवें आहेत.

**मुंबई शहरांत दुधाचा खप**

मुंबई शहरांत दररोज ७,५०० मण दूध खपतें, त्यापैकीं २,८५० मण दुधाचा उठाव रेस्टॉरंटस, हॉटेल्स, व चहाचीं दुकानें ह्यांत होतो. त्यापैकी ९०% दुधाचा उपयोग चहा व कॉफी करण्याकडे होतो.

**ॲक्युअरीची प्राथमिक परीक्षा**

इन्स्टिट्यूट ऑफ ॲक्युअरीजची पहिली परीक्षा ३० व ३१ जुलै रोजीं होणार आहे. उमेदवारांनीं त्यापूर्वी १० आठवडे अर्ज पाठवावे. युद्धपरिस्थितीमुळें मध्यंतरीं ही परीक्षा घेण्याचें बंद होतें. मुंबई केंद्राची व्यवस्था प्रो. पाणंदीकर, प्रिन्सिपॉल, सिडनहॅम कॉलेज, ह्यांचेकडे आहे.

**अमेरिकेची लोकसंख्या**

अमेरिकेची लोकसंख्या आतां १३,८१,००,९७४ झाली आहे. १९४० सालीं ती १३,१६,६९,२७५ होती.

**विमा एजंटाची फसवणूक**

गेल्या जुलै महिन्यांत एका विमा एजंटास तोतया जमीनदारांच्या व व्यापाऱ्यांच्या टोळीनें कसें बनविलें, ह्याची हकीकत प्रसिद्ध झाली आहे. ह्या टोळींतील एकानें मुंबई येथें मलबार हिलवरील बंगल्यांतील "जमीनदारास" २,००,००० रुपयांचा विमा उतरावयाचा आहे, असें एका विमा एजंटास सांगून बंगल्यांवर नेलें. "जमीनदारा" चा विमा मिळवून देण्यासाठी "जमीनदाराच्या सेक्रेटरी" स २,००० रुपये देण्याचें ठरलें, "जमीनदारा" स खुष करण्यासाठी त्यांचेबरोबर टेबल रेस नांवाचा खेळ पैसे लावून खेळण्यास त्या एजंटास प्रवृत्त करण्यांत आलें. पहिले चार डाव एजंटास जिंकू देऊन, "जमीनदारा" नें पांचवा डाव जिंकला व एजंट १६,००० रुपयांस बुडाला! टोळीनें पैसे घेऊन पोबारा केला. टोळीपैकी एकास अटक झाली आहे.

**चहांत दुध घालण्यास बंदी**

मुंबई शहरांतील हॉटेलांत दूध विकण्याची बंदी करण्यांत आली आहे. चहा, कॉफी, दहीं, ताक, इत्यादींसाठी गाईचें अगर म्हशीचें दूध वापरतां कामा नये; अशा दुधाची चहा कॉफी वगैरे विकतां कामा नये. रहाण्याची व्यवस्था असणारा क्लब, लॉजिंग हाऊस, आगगाडींतील फराळाचा डबा, ह्यांस हा नियम लागू नाहीं. १५ फेब्रुवारीपासून हा नियम अमलांत येईल. स्किम मिल्क पावडर म्हणजे मलई काढलेल्या दुधाची पूड हॉटेलवाल्यांस पुरविण्यांत येईल. नऊ भाग पाण्यांत एक भाग ही पूड टाकल्यास त्याचें दूध तयार होतें व त्यापासून दहीं व ताकसुद्धां होऊं शकतें. सहा वर्षांखालील मुलें व गर्भवती आणि बाळंत स्त्रिया ह्यांस मुबलक सकस दूध मिळावें, ह्याकरितां ही योजना आहे. तीन महिन्यांपुरता स्किम पावडरचा सरकारजवळ सांठा आहे व पुरवठा पुढें सतत चालू राहील असें आश्वासन आहे. हॉटेलवाल्यांसेरीज इतरांस ही पूड मिळणार नाहीं. ह्या पुडीच्या वापरामुळें २,८५० मण दूध जादा उपलब्ध होईल.

## नोटीस

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड**

नोटीस देण्यांत येतें कीं, बँकेच्या भागीदारांची दहावी साधारण सभा रविवार ता. २५ फेब्रुवारी १९४५ रोजीं सायंकाळीं ४ वाजतां ( नवीन स्टॅ. टा. ) बँकेचें रजिस्टर्ड ऑफिस, काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें शहर, या ठिकाणीं खालील कामासाठी भरेल.

( १ ) बँकेचा ता. ३१ डिसेंबर १९४४ अखेरचा ताळेबंद, नफातोटा पत्रक आणि डायरेक्टर बोर्डाचा व ऑडिटरांचा रिपोर्ट याचा विचार करणें.

*( २ ) डिव्हिडंड व बोनस मंजूर करणें.

( ३ ) निवृत्त होणाऱ्या ( फेर निवडणुकीस पात्र असलेल्या ) चार डायरेक्टरांचे जागीं डायरेक्टरांची निवडणूक करणें.

( ४ ) ऑडिटर्स नेमणें व त्यांचा मुशाहिरा ठरविणें.

( ५ ) अध्यक्षांचे परवानगीनें पुढें येणारी इतर कामें.

पुणें शहर } बोर्डाचे हुकुमावरून
ता. २२-१-१९४५ } सी. व्ही. जोग
मॅनेजर

वि. सू.:—बँकेचीं शेअर ट्रॅन्फर बुकें ता. १६ फेब्रुवारी, १९४५ ते २ मार्च १९४५ ( दोन्ही दिवस धरून ) बंद राहतील.

* डिव्हिडंड व बोनस मंजूर झाल्यानंतर तें शुक्रवार ता. २३ मार्च १९४५ पासून दिलें जाईल. डिव्हिडंड वॉरन्टस भागीदारांच्या नोंदलेल्या पत्त्यावर टपालानें पाठविली जातील. पत्ता बदलला असल्यास बँकेकडे सत्वर कळवावें.


—सुशिक्षित, त्रिलोकसुंदरी व मोहिनी—

**सुशिलाराणीची**

रंगीत नृत्यें पाहून रोज हजारों पुणेंकर रसिकांच्या

**'डोळ्याचें पारणें' फिटत असतें!**

नवहंसचा अप्रतिम पौराणिक बोलपट

**द्रौपदी**

**हाऊसफुल्ल ११ वा दिवस!**

रोज ६॥ व १० वा.

रिझर्व्हेशन सकाळीं १० ते १२ ] — [ डायमंड प्रकाशन

**प्रभात**

[ पुणें भूषण बोलपटगृह ]

**मुंबईत १५ वा सातवडा!**

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती .... | ३४ | ५ खेडेगांवीं उद्योगधंद्यांचें स्थान ... | ३८ |
| २ पदार्थ-वाटणीचें कार्य... | ३५ | ६ आर्थिक अभिवृद्धीची योजना ... | ३९ |
| ३ धान्यांतील किडीवर प्रयोग ... | ३६ | ७ घर भाडेकरू परिषदेची फलश्रुति ... | ४० |
| ४ स्फुट विचार ... ... | ३७ | ८ आपल्यापुढील कांहीं प्रश्न | ४१ |
| सहामाहींतील परराष्ट्रीय व्यापार—अर्धन बँकांवर युद्धाचे परिणाम—हिंदी बँकांसंबंधीं ताजे आंकडे | | ९ खर्चाजं कमी झाला ... | ४१ |
| | | १० माणुसकी व व्यवहार यांचा समन्वय ... | ४२ |
| | | ११ सहकारी वृत्त ... | ४३ |



# अर्थ

बुधवार, ता. ३१, जानेवारी १९४५


## सहकारी संस्थांचें पदार्थ-वाटणीचें कार्य

सामान्यतः सर्वच हिंदुस्थानांत आणि विशेषतः मुंबई प्रांतांत जिनसांची खरेदी व विक्री करण्याचा व्यवहार सहकारी संस्थांनीं म्हणण्यासारखा हातीं घेतला नव्हता; परंतु युद्धपरिस्थितीमुळें ह्या व्यवहाराला चालना मिळून त्याचा विस्तार आतां बराच झाला आहे. बेताच्या व निश्चित भावानें जरूरीचे जिन्नस मिळण्याची अडचण लोकांना तीव्रतेनें भासूं लागल्याकारणानें आणि त्यांच्या विक्रींत नफेबाजी बोकाळूं लागल्यामुळें योग्य किंमतीनें धान्य, साखर, रॉकेल, कापड इत्यादि माल विकण्याची खास व्यवस्था करणें सरकारास आवश्यक झालें. जिल्ह्यांमधून ठिकठिकाणीं, लहान-मोठ्या शहरांत व गांवांत नियंत्रित अशीं दुकानें चालू करण्यांत आलीं आणि त्यांमध्यें जरूरीचे जिन्नस ठराविक किंमतीनें मिळण्याची सोय झाली. स्वतःच्या कार्याचा विस्तार करण्याच्या आणि जनतेस अडचणीच्या प्रसंगीं मदत देण्याच्या ह्या संधीचा उपयोग सहकारी संस्थांकडून निरनिराळ्या प्रांतांत करण्यांत आला आहे. मुंबई प्रांतांतहि अशीच इष्ट प्रगति झाली आहे आणि तीमध्यें सरकारी अधिकारी व सहकारी कार्यकर्ते ह्यांनीं परस्पर सहाय्याचें धोरण अंगिकारलें आहे. नियंत्रित जिनसांच्या विक्रीचे परवाने व सवलती देतांना सहकारी संस्थांस अग्रतेनें वागवण्याचें मुंबई सरकारनें ठरवलें असून त्याप्रमाणें जिल्हाधिकारी व्यवस्था करीत आहेत. "इंडियन कोऑपरेटिव्ह रिव्ह्यू" च्या ताज्या अंकांत मध्यप्रांत, ओरिसा, त्रावणकोर व मुंबई ह्यांमध्यें सहकारी पद्धतीच्या माल-विक्रीची प्रगति कशी झाली आहे ह्याची माहिती निरनिराळ्या लेखांत प्रसिद्ध करण्यांत आली आहे. तीवरून मालविक्रीचें कार्य कोणत्या परिस्थितींत सहकारी संस्थांनीं स्वतःच्या अंगावर घेतलें आहे, त्यांच्या अडचणी काय आहेत आणि हा व्यवहार यशस्वी रीतीनें चालण्यासाठीं कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे ह्याची कल्पना येते.

### मुंबई प्रांतांतील सहकारी विक्रीची व्यवस्था

वरील लेखांमध्यें श्री. एन्. व्ही. नायक, असिस्टंट रजिस्ट्रार, ह्यांनीं मुंबई प्रांतांत सहकारी मालविक्रीची व्यवस्था कशी झालीं आहे ह्याचें वर्णन संगतवार व बोधप्रद रीतीनें केलें आहे त्याचा समावेश झालेला आहे. युद्धपरिस्थितीमुळें बाजारभाव कडकूं लागले तेव्हां बेताच्या किंमतीनें जरूरीचा माल विकणारीं दुकानें स्थानिक कमिट्या, म्युनिसिपालिट्या, पंचायती ह्यांनीं चालू केलीं आणि जिल्ह्यांतून बाहेर खाद्यपदार्थ जाण्याची बंदी झाली तेव्हां त्यांस कलेक्टरांनीं माल दुसरीकडून आणण्याच्या सवलती दिल्या. ह्या स्थितींत सहकारी रजिस्ट्रारनीं सहकारी बँका, नोकरांच्या सोसायट्या व स्टोअर्स ह्यांनीं सदरहु व्यवहार आपल्या हातीं घ्यावा ह्यासाठीं त्यांस उत्तेजन दिलें, त्याची माहिती देऊन श्री. नायक ह्यांनीं बेळगांव आणि भडोच ह्या जिल्ह्यांत सहकारी कार्यकर्त्यांनीं मालाच्या खरेदी-विक्रीच्या व्यवस्थेच्या केलेल्या योजनांचें वर्णन केलें आहे. सभासदांच्या मागण्यांस अनुसरून मालाची खरेदी व पुरवठा करणें हा प्रारंभाचा व्यवहार होता. सहकारी संस्थांनीं स्वतःच्या जबाबदारीवर व भांडवलानें मालाची खरेदी करण्याचीहि प्रथा पाडली. शहरांतील व खेडेगांवांतील सोसायट्या, बँका, स्टोअर्स, खरेदी-विक्री संस्था ह्यांच्या उपयोगासाठीं जुळतील असे पोटनियम सहकारी खात्यानें तयार करून त्यांच्या व्यवहाराबाबत विशिष्ट सवलतीहि दिल्या. नियंत्रित मालाच्या खरेदी-विक्रीसाठीं जरूर ते परवाने जिल्हाधिकाऱ्यांनीं दिल्या कारणानें सहकारी संस्थांचें कार्य सुकर झालें. बेळगांव जिल्ह्यांत निवडक शहरीं व खेडेगांवीं सोसायट्या व बँकांकडे योग्य किंमतीनें मालाची विक्री करणाऱ्या दुकानांचें काम सोंपविण्यांत आलें आणि त्यांच्यावर देखरेख करण्यासाठीं सरकारी अधिकारी व बिनसरकारी कार्यकर्ते ह्यांच्या समित्यांची योजना झाली. १९४२ सालीं ह्या कार्यास प्रारंभ होऊन सहकारी माल-विक्रीच्या संस्थांची संख्या वाढत गेली व १९४४ मध्यें ती ७३ चे वर गेली. १९४३-४४ सालांत त्यांची विक्री सुमारें २८ लक्ष रुपयांची झाली असावी. भडोच जिल्ह्यांत निराळ्या तऱ्हेनें उपक्रम करण्यांत आला. भडोच को-ऑपरेटिव्ह स्टोअर्स ह्या एका मध्यवर्ती संस्थेनें जिल्हाभर शाखा स्थापून मालविक्रीची व्यवस्था केली. तिनें १९४३ मध्यें २४ लक्षांचा व्यवहार करून ३२ हजार रुपये नफा मिळवला. वरील दोन्ही जिल्ह्यांत सेंट्रल बँकेचें उत्कृष्ट सहाय मिळालें आहे. इतर जिल्ह्यांत मालाच्या सहकारी वाटणीचा विस्तार कसा झाला आहे ह्याची बोधप्रद माहिती श्री. नायक ह्यांनीं आपल्या लेखांत दिली आहे. ह्या वाटणीच्या व्यवस्थेस रॅशनिंगमुळें कसें उत्तेजन मिळालें आहे ह्याचें त्यांनीं केलेलें वर्णन वाचनीय आहे. मुंबई शहरांत रॅशनिंगला ता. ९ मे १९४३ रोजीं प्रारंभ झाला; ४ जून रोजीं मुंबई उपनगर जिल्ह्याच्या कांहीं भागांत तें पसरलें आणि ता. ५ जुलै रोजीं पुण्यांत त्यास सुरवात झाली. कित्येक सोसायट्यांनीं रॅशनच्या दुकानाचे लायसेन्स मिळविलें व नव्या स्टोअर सोसायट्याहि स्थापन झाल्या. खेडेगांवांतहि सोप्या पद्धतीचें रेशनिंग अमलांत आल्यामुळें सहकारी वाटणीचा प्रश्न तेथेंहि महत्त्वाचा झाला.

### खेडेगांवांतील माल वाटणी

मुंबई सरकारनें शेतकऱ्यांकडून धान्य खरेदी करण्याची योजना अंमलांत आणली आहे आणि खेडेगांवांतून मालाच्या विक्रीची व्यवस्था करणें त्यास आवश्यक झालें आहे. निरनिराळ्या जिल्ह्यांत हीं दुकानें किती ठिकाणीं आहेत आणि

त्यांपैकीं सहकारी व्यवस्थेखालीं किती आहेत, तसेंच विक्रीबद्दल किती कामिशन देण्यांत येतें ह्याविषयींचे सप्टेंबर १९४४ मधले आकडे खालीं दिले आहेतः—

| जिल्हा | दुकानें | | सहकारी सोसायट्यांच्या ताब्यांतील दुकानें | | |
|---|---|---|---|---|---|
| | पसंत केलेली | चालू | संख्या | मासिक सरासरी विक्री | विक्रीवर कमिशन |
| अहमदाबाद | १४२ | १३४ | ६८ | १००ते१५०मण (लहान ठिकाणीं) ८०० ते १००० मण ( मोठीं ) | ३½% + गाडी-भाडें ( दर मेलीं दर मणीं = २½आणे) |
| खेडा | २५९ | २३९ | १०८ | ... | दर मणीं ८ आणे ते १ रु. +गाडी-भाडें. |
| भडोच | ६४ | ६४ | ४९ | १०० मण | |
| पंचमहाल | ४४ | ३९ | २४ | ... | ४% खेडीं ५% गोध्रा |
| सुरत | १५८ | १४९ | २१ | १०० मण | ... |
| ठाणा | १३९ | १३९ | ९३ | ... | १२½% |
| नगर | ३६७ | २९२ | ४२ | ५ ते २५० मण | ३ ते ६½% |
| पू. खानदेश | १५१ | १४७ | ३८ | १२५ मण | ७ १३/१६% |
| प. खानदेश | १२१ | ९६ | ५८ | १२५ मण | ५% ज्वार २½% गहूं |
| नाशिक | १६४ | १५७ | ७३ | १९३ मण | दर पोत्यास १रु. |
| पुणें | १८९ | १२८ | ४९ | ... | ६¼% |
| सातारा | २३० | २१७ | ११९ | १६० मण | ... |
| सोलापूर | १०६ | १०१ | १३ | ५०० तें ७५० मं. | ... |
| बेळगांव | ८१९ | ७०१ | ४९ | २५ ते ३७ मण | ४ ते ५% |
| विजापूर | १२४ | ८४ | ३७ | ५० ते ७५मण | ... |
| धारवाड | १३६ | १०५ | ९१ | १६३ मण | ... |
| कानडा | १८२ | १५२ | ४७ | ... | तांदुळाचें पोतें १½ रु.इतर धान्यें २रु. |
| कुलाबा | १५९ | १५९ | २० | ... | रोखीनें ६% उधार ४ ११/१६% |
| रत्नागिरी | ३९५ | ३९५ | ५ | ... | ४% + दर मैलीं पोत्यास १ आ. |

### सल्फेट ऑफ अमोनियाचा कारखाना

सल्फेट ऑफ अमोनियाचें उत्पादन करणारा पहिला हिंदी कारखाना बिहारमध्यें धनबादशेजारीं उभारण्यांत येईल. प्रत्यक्ष उत्पादनास १९४७ सालीं प्रारंभ होईल. शेतकऱ्यांस १२५ रुपये टन भावानें खत मिळावें, अशी अपेक्षा आहे. कारखाना सरकारी मालकीचा राहील व त्याची व्यवस्थाहि सरकार पाहील.

### अलाइड ॲग्रिकल्चरल इंडस्ट्रीज, लि., पुणें

वरील नांवाची खाजगी लिमिटेड कंपनी श्री.त्रिं. रा. चिपळूणकर व श्री. द. ग. घाणेकर ह्यांनीं नुकतीच नोंदली आहे. तिचें अधिकृत भांडवल १ लक्ष रुपये आहे. व्यापारी पद्धतीनें शेती करणें हा तिचा उद्देश आहे. वरील दोघे व श्री. न. गं. आपटे हे कंपनीचे डायरेक्टर व श्री. स. वा. दातार हे कंपनीचे सेक्रेटरी आहेत. कंपनीचा नोंदलेला पत्ता ९५२ सदाशिव, पुणें २ असा आहे. कांदे व बटाटे वाळवून वेगवेगळ्या प्रकारांत ते विकणें, हा कंपनीचा व्यवहार राहील व त्यासाठी कंपनीनें नांदगाव व उरुळी येथें शेतें घेतलीं आहेत, असें समजतें.

## धान्यांतील कीड वाढूं न देण्याचे यशस्वी प्रयोग

### किर्लोस्करवाडी येथील कोठारांतील उत्तेजनकारक अनुभव

पाऱ्याच्या वायूचा धान्याचें किडीपासून संरक्षण करण्याकडे काटकसरीनें कसा उपयोग करतां येईल, ह्यासंबंधीं फर्ग्युसन कॉलेजांतील प्राध्यापक डॉ. के. के. ढोळे, एम्. एससी., पीएच. डी., ह्यांचें संशोधन चालू आहे. लहान प्रमाणावरील त्यांचे प्रयोग यशस्वी झाल्यानंतर त्यांनीं किर्लोस्करवाडी येथील किर्लोस्कर बंधु लि. च्या कोठारांत नुकतेच मोठ्या प्रमाणावरील प्रयोग पुरे केले आहेत. सुमारें ४०८ पोत्यांवर पाऱ्याच्या भुकटीचा प्रयोग करून, तीं पोतीं जून अखेर ते डिसेंबर प्रारंभापर्यंत म्हणजे सुमारें पांच महिने साठवून ठेवलीं. ज्वारी, हरबरे, गहू, तुरीची डाळ, इत्यादींचीं तीं पोतीं होतीं. प्रत्येक पोत्याचें वजन २०० ते २२५ पौंड असुन तीं ६५'×३०'×१५' अशा कोठारांत ठेवण्यांत आलीं होतीं. त्यांचेबरोबरच, साधें ( ज्यावर पाऱ्याचा प्रयोग केलेला नव्हतें असें ) धान्य भरलेलीं २,५०० पोतीं होतीं. पांच महिन्यांनंतर सर्व प्रकारच्या पोत्यांचे नमुने तपासून पहातां, खालील-प्रमाणें त्यांची परिस्थिति आढळली:—

| धान्याचें नांव | मूळ परिस्थिति | पांच महिन्यांनंतर परिस्थिति | पाऱ्याचा प्रयोग न केलेल्या धान्याची पांच महिन्यांनंतर परिस्थिति |
|---|---|---|---|
| हरबरा | दाण्यांवर थोडीं अंडीं | एकाहि दाण्यास भोक नाहीं | प्रत्येक दाण्यावर भोकें. कांहींवर दोन किंवा तीन |
| ज्वारी | दाणे थोडेसे किडलेले | ३% दाणे किडले | ३४% दाण्यांस भोकें व कांहीं भुगा |
| गहू | चांगला | एकाहि दाण्यास कीड नाहीं | ,, |
| तूरडाळ | ,, | ,, | थोडीशी कीड व नुकसान. थोडा भुगा. |

पाऱ्याचा प्रयोग केलेलें व न केलेलें धान्य एकाच कोठारांत शेजारीं ठेवलेलें होतें, हें लक्षांत घेतलें असतां, प्रयोगाचें यश लक्षांत येईल. जुलै ते डिसेंबर हा मोसम किडीचे वाढीस पोषक असतो, हेंहि विसरतां कामा नये. अंडीं व बारीक जंतू मारण्यास पाऱ्याचा उपयोग होतो; मोठ्या किडीचा संपूर्ण नाश करण्याची त्यांत शक्ति नाहीं. ज्या धान्यास अद्याप कीड लागलेली नाहीं, असें धान्य किंवा वाढल्यानंतर धान्याचा फारसा नाश करीत नाहीं असें कीड लागलेलें धान्य पाऱ्याच्या उपयोगास विशेष अनुकूल ठरेल, हें उघड आहे. धान्यास थोडीशी कीड लागलेली असेल, तर त्याची वाढ थांबते, परंतु, अगोदरच फार कीड लागलेल्या धान्याचा बचाव करण्यास पाऱ्याच्या उपयोगाबरोबर ज्यामुळें कीड मरेल, नाहींशी होईल किंवा चाळणींतून गळून जाईल अशी इतरहि कांहीं योजना करावी लागेल. कीड घालवून देणारें एक द्रव्य तयार करण्यांत येत आहे, त्याची हकीकत पुढें प्रसिद्ध करण्यांत येईल. सुमारें १०,००० रुपये किंमतीचें धान्य प्रयोगासाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल व इतरहि सवलती दिल्याबद्दल डॉ. ढोळे ह्यांनीं किर्लोस्कर बंधु लि. चे आभार मानले आहेत.

## स्फुट विचार

### सहामाहींतला परराष्ट्रीय व्यापार

चालू सरकारी वर्षाच्या पहिल्या सहामाहींतल्या (एप्रिल–सप्टेंबर, १९४४–४५) हिंदुस्थानच्या परराष्ट्रीय व्यापाराचे आकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरून असें दिसतें कीं ह्या सहा महिन्यांच्या अवधींत आयात व निर्गत व्यापारांत वाढ झाली. पूर्वीच्या वर्षाच्या पहिल्या सहामाहीच्या मानानें आयात ४२ कोटि रुपयांनीं आणि निर्गत १६ कोटींनीं वाढली. आयात ५२ कोटींची ९४ कोटि झाली आणि निर्गतीचे आकडे अनुक्रमें करून ९३ व १०९ कोटि असे होते. लढाऊ सामुग्रीच्या आयात–निर्गतीचा समावेश ह्या आकड्यांत केलेला नाहीं हें येथें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. धान्यांच्या आयातींत वाढ झाली आणि त्यांची निर्गत घटली. कच्च्या मालाच्या आयातींमधील वाढ डोळ्यांत भरण्यासारखी होती पण त्यांची निर्गत अगदी अल्प प्रमाणांत वाढली. पक्या मालाच्या आयातींत थोडी वाढ दिसून आली, पण त्याच्या निर्गतींतली वाढ मात्र बरीच मोठी होती. ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांशीं हिंदुस्थानचा आयातीचा व निर्गतीचा व्यापार अधिक झाला. इतर देशांतून अधिक माल हिंदुस्थानांत आला, पण त्यांचेकडे निर्गत झालेल्या मालांत मात्र अल्प अशी वाढ झाली. निर्गतीच्या किंमतीपेक्षा आयातीची किंमत अधिक प्रमाणांत वाढल्याकारणानें ह्या देशाचें परदेशांकडून व्यापारमूलक येणें घटलें आहे. १९४३–४४ सालच्या पहिल्या सहा महिन्यांत देण्यापेक्षा येणें ४४ कोटि, ५२ लक्ष अधिक होतें, तें चालू वर्षाच्या तत्सम मुदतींत २० कोटि, ४२ लक्ष भरलें. साम्राज्यांतर्गत देशांतून आलेल्या मालाची किंमत वाढली आणि तीहि पेक्षा अधिक वाढ इतर देशांतून झालेल्या आयातीमध्यें दिसून आली. उदाहरणार्थ, इराणमधून झालेली आयात १०½ कोटींची २६ कोटि रुपयांवर गेली, इजिप्तमधली ६½ कोटींपासून सुमारें १० कोटिपर्यंत चढली आणि अमेरिकेचा आकडा दुप्पट होऊन १७½ कोटिवर गेला. हिंदुस्थानच्या निर्गतींतील वाढींत साम्राज्यांतर्गत देशांचा हिस्सा मोठा आहे. अमेरिका, इजिप्त व इराण ह्या देशांनीं हिंदुस्थानचा अधिक माल घेतला. तुर्कस्तान, इराक, इराण, अरेबिया व सीरिया ह्या देशांचा हिस्सा मात्र घटला.

---

### सहकारी अर्बन बँकांवर युद्धाचे परिणाम

बाँबे को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशननें आपल्या सभासद बँकांच्या माहितीकरितां आणि मार्गदर्शनाच्या हेतूनें, प्रांतिक व सेंट्रल सहकारी बँकांच्या व्यवहारांची दिशा युद्धपरिस्थितीमुळें कशी बदलली आहे हें दर्शवणारे तुलनात्मक आकडे एक महिन्यामागें प्रसिद्ध केले होते आणि त्यांच्या स्वरूपाचें दिग्दर्शन "अर्था"मध्यें आम्हीं गेल्या महिन्यांत केलें आहे. असोसिएशनच्या ह्या पत्रकांतील माहितीची मांडणी प्रो. काळे ह्यांनीं केली होती. तशाच प्रकारची छाननी त्यांनीं आतां अर्बन सहकारी बँकांच्या बाबतींत केली असून असोसिएशननें त्यांनीं मांडलेले आकडे व त्यांवरून सुचवलेले विचार ग्रथित केलेलें दुसरें पत्रक पहिल्याच्या जोडीस प्रसिद्ध केलें आहे. (Recent Trends in Co-operative Banking in Bombay Province II—Urban Banks). ठेवींमध्यें वाढ, ह्या वाढलेल्या पैशाचा कर्जे देण्याकडे विनियोग होण्याच्या मार्गांत अडचणी, पूर्वीच्या प्रमाणबद्धतेच्या मर्यादेच्या पलीकडे करावी लागणारी रोख्यांतली गुंतवण आणि तरत्या पैशाची व रोकडीचा अमर्याद विस्तार हे युद्धजन्य परिणाम ब्रिटिश व हिंदी जॉइंट स्टॉक बँकांप्रमाणेंच सहकारी सेंट्रल बँकांच्या व्यवहारांत आढळतात असें प्रो. काळे ह्यांनीं त्यासंबंधांतले तुलनात्मक आकडे देऊन पहिल्या पत्रकांत दाखवलें होतें. प्रस्तुतच्या दुसऱ्या पत्रकांत मुंबई प्रांतांतील १८ प्रातिनिधिक बँकांच्या हिशेबाच्या आकड्यांची छाननी करून त्यांनीं असें दाखवलें आहे कीं युद्धाचे हेच परिणाम पण अधिक ठळक रीतीनें अर्बन बँकांवर घडून आले आहेत. ह्या बँकांचें कार्यक्षेत्र व सभासदत्व मर्यादित असल्यानें ठेवी वाढल्या असतांना कर्जांमध्यें त्यांस प्रगति करतां आलेली नाहीं आणि त्यांपैकीं कांहींची तर ह्या बाबतींत पीछेहाटच झाली आहे. सेंट्रल व अर्बन बँका ह्यांच्या ठेवींशीं १९३९ व १९४४ ह्या सालीं त्यांच्या कर्जांचें व गुंतवणुकीचें प्रमाण कसें बसतें हें खालीं दिलेल्या तक्त्यावरून दिसून येईलः—

ठेवींशीं कर्जे व गुंतवणूक ह्यांचें प्रमाण

| | अर्बन बँका | | सेंट्रल बँका | |
|---|---|---|---|---|
| | १९३९ | १९४४ | १९३९ | १९४४ |
| दिलेल्या कर्जांचें ठेवींशीं प्रमाण | ७०% | २८.३% | ५८% | ४१% |
| रोख्यांतील गुंतवणुकीचें ठेवींशी प्रमाण | २६·७ | ४६.९% | ३६% | ४८% |

---

### हिंदी बँकांसंबंधीं ताजे आकडे

हिंदी बँकांसंबंधीचे ३१ डिसेंबर, १९४४ अखेरचे आकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरून हिंदी बँकांच्या व्यवहारावर चांगला प्रकाश पडतो. ह्या तिमाहींत बरेली कॉर्पोरेशन बँक, महाराष्ट्र बँक व इंडो-मर्कंटाइल बँक ह्या तीन बँका शेड्यूल्ड बँकांच्या यादींत दाखल झाल्या. शेड्यूल्ड बँकांची संख्या १९४३ अखेर ६० होती, ती गेल्या बारा महिन्यांत ११ नें वाढून ७१ झाली. त्यांपैकीं १६ बँका एक्सचेंज बँका आहेत. ३०-९-४३ रोजीं शेड्यूल्ड बँकांच्या एकूण कचेऱ्यांची संख्या १,७२५ होती, ती ३०-९-४४ रोजीं २,२३९ झाली. म्हणजे, त्यांत ५१४ ची भर पडली. शेड्यूल्ड बँकांजवळील एकूण ठेवींचा आकडा बारा महिन्यांत १६१ कोटि रुपयांनीं वाढून वर्षअखेर तो ८१९ कोटि रुपयांवर गेला. बँकांनीं दिलेल्या कर्जांचें एकूण देण्यांशीं प्रमाण २५·४७% होतें, तें ३०·४३% झालें; आणि त्याचा परिणाम म्हणजे रिझर्व्ह बँकेकडे त्यांनीं जरूरीपेक्षा ६० कोटि रुपये ज्यास्त ठेवले होते, त्याऐवजीं आतां ३९ कोटि रुपयेच ज्यास्त ठेवले गेलेले आहेत. रिझर्व्ह बँकेच्या नोटा ८४० कोटि रुपयांवरून १,००९ कोटि रुपयांवर गेल्या आहेत, आणि सहाजीकच स्टर्लिंगमधील रकम ७३४ कोटींची ९०४ कोटि रुपये झाली आहे.

## आर्थिक नियोजनांत खेडेगावी उद्योगधंद्यांचें स्थान

### श्री. वैकुंठराय मेहता ह्यांचे विचार

#### जीवनोपयोगी वस्तूंची समप्रमाणांत वाटणी

युद्धोत्तर आर्थिक योजना आतांपर्यंत प्रसिद्ध झाल्या आहेत, त्यांत खेडेगांवी लहान प्रमाणावरील उद्योगधंद्यांना त्यांच्या महत्त्वास योग्य असें स्थान मिळालेलें दिसत नाहीं. एका योजनेंत खेडेगांवी उद्योगधंद्यांची उपयुक्तता काल व विस्तार ह्या दोन्ही दृष्टींनीं मर्यादित आहे, तर दुसऱ्या योजनेंत त्याचा ओझरता उल्लेखहि नाहीं. मुंबई सरकारच्या योजनेंतहि, आगामी मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाच्या क्षेत्रांत खेडेगांवी उद्योगधंद्यांस कोणतें स्थान मिळणार, हें निश्चित सांगितलेलें नाहीं. हिंदुस्थान सरकारच्या घोषणाहि ह्याबाबत खुलासा करीत नाहींत. काँग्रेसच्या नेतृत्वाखालीं काम करणाऱ्या नॅशनल प्लॅनिंग कमिटीनें खऱ्या हिंदी प्रश्नाच्या–आपल्या कोट्यवधि बांधवांस उद्योग मिळवून देण्याच्या–पार्श्वभूमीवर आपलें काम सुरू केलें होतें. उद्दिष्टाचें दूरगामित्व व स्पष्टपणा ह्या बाबतींत त्या कमिटीची बरोबरी कोणतीहि योजना करूं शकलेली नाहीं.

#### राजकीय व आर्थिक शक्ति

हिंदुस्थानांत केवळ मोठे कारखाने स्थापल्यानें प्रश्न सुटणार नाहीं. शेतीवरील लोकसंख्येचें अवलंबन दूर करण्याचें त्यांचें सामर्थ्य अति मर्यादित आहे. इंग्लंड व अमेरिका हीं राष्ट्रें आपल्या जनतेच्या रहाणीचें मान सुधारूं शकलीं, त्याचें मुख्य कारण त्यांचेजवळ असलेली प्रचंड राजकीय व आर्थिक शक्ति हें होय. तिचे जोरावर परराष्ट्रांतील बाजारपेठा काबीज करणें व मागसलेल्या लोकांचा स्वस्त मजूर म्हणून उपयोग करून घेणें, हें त्यांस साधलें. हिंदुस्थानची आजची परिस्थिति व आपली आजवरची रूढी ह्या दोन्ही गोष्टी वरील धोरणास पोषक नाहींत.

वाढत्या उत्पादनाची वांटणी विषम प्रमाणांत होऊं नये, अशी योजना करावयाची, तर मोठ्या प्रमाणावरील कारखानदारीच्या पद्धतींपेक्षा लहान प्रमाणावरील खेडेगांवीं उत्पादनपद्धति जास्त सोईची आहे, कारण तींत नफ्याचें उद्दिष्ट योग्य मर्यादेंत राहूं शकतें आणि वेगवेगळ्या घटकांतील हितसंबंधांचा विरोध बोथट होतो.

#### खरा प्रश्न व त्यावर उपाय

यंत्रसामुग्रीच्या सहाय्यानें उत्पादन करणें जास्त किफायतशीर असलें, तरी यंत्रांच्या उपयोगामुळें उत्पादन खर्च कमी होतोच, असें म्हणतां येणार नाहीं. हा प्रश्न बाजूस ठेवला, तरी सुचविल्यांत येणाऱ्या योजनांमुळें, जो मुख्य हिंदी प्रश्न सोडविण्याचा तो अधिकच बिकट होत नाहींना हें आधीं पाहिलें पाहिजे. हिंदी लोकांना आज पुरेसें काम मिळत नाहीं, तेव्हां तें मिळवून देणारे उद्योगधंदे सुरू करणें श्रेयस्कर, कीं कारखाने वाढवून बेकारींत भर घालणें श्रेयस्कर? यंत्रसामुग्रीच्या उपयोगामुळें तिचे दास होण्याची पाळी येते ती वेळींच टाळली पाहिजे.

कारखान्यांत मजुरी करण्याऐवजी, लहान प्रमाणावर उत्पादन करण्यांत कामगारांचें मनुष्यत्व टिकूं शकतें व त्यांचें जीवन सुसह्य व सुखदायक होण्यास सहाय होतें. यंत्राशीं काम करणारा मनुष्य त्याचाच एक भाग होऊन बसतो, तर खेडेगांवी उद्योगधंद्यांतील कामगार डोकें चालवून जिवंतपणा राखूं शकतो.

कारखान्यांतील यांत्रिक उत्पादनापेक्षां लहान प्रमाणावरील उद्योगाचें दर माणशीं दर दिवशीं उत्पादन साधारणतः कमी भरेल हें उघड आहे. त्यामुळें एकूण उत्पादनहि कमी येईल. परंतु आर्थिक नियोजनाचें ध्येय दर माणशीं उत्पादन हें नाहीं. प्रत्येकास जीवनोपयोगी वस्तू भरपूर प्रमाणांत मिळाव्यात, ह्या दृष्टीनें उत्पादनांत वाढ झाली पाहिजे, आणि लहान प्रमाणावरील गटांचें उत्पादन चांगल्या तऱ्हेनें आखलें व मालाची वाटणी नीट झाली तर तें अपुरें पडण्याचें कारण नाहीं. मानव जातीच्या कांहीं भागाच्या किंवा देशांतील कांहीं वर्गांच्या गरजा वाढविण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी जीवनास आवश्यक अशा गोष्टी सर्वांस समप्रमाणांत मिळाव्यात. असा प्रयत्न अगोदर झाला पाहिजे; तें समाजाच्या ज्यास्त आणि खऱ्या हिताचें आहे.

#### खेडेगावीं उद्योगधंद्यांची आवश्यकता

कांहीं माल, विशेषतः उत्पादनोपयोगी वस्तू खेडेगांवांत लहान प्रमाणावर तयार करतां येणार नाहींत. कांहीं कामें हातांनीं करण्यामध्यें फार धोका असेल. कांहीं प्रकारचे उद्योगधंदे मोठ्या प्रमाणावरच चालविणें क्रमप्राप्त असेल. अशा सर्व उद्योगांचें राष्ट्रीयकरण होणें आवश्यक आहे. अर्थात् सरकारची खातीं म्हणून ते चालविण्यांत येऊं नयेत. त्यांत उपभोक्ते, उत्पादक, कामगार व कर देणारे ह्या सर्वांचे हितसंबंध पाहिले गेले पाहिजेत. असे व्यवहार सोडले, तर बाकीच्या मालाचें उत्पादन खेडेगांवांतील लहान प्रमाणावरील पद्धतीनें यशस्वी रीतीनें चालू ठेवणें अगदीं शक्य आहे.

अर्थात्, खेडेगांवी उद्योगधंद्यांची पुनर्घटना केल्याखेरीज त्यांचेकडून अपेक्षित कार्य घडून येणें शक्य नाहीं. गेल्या शतकांतील औद्योगिक क्रांतीमुळें नवी परिस्थिति निर्माण झाली आहे, तीस अनुसरून आर्थिक पुनर्घटना करणें खेडेगावी धंद्यांस जमलें नाहीं. ती पुनर्घटना घडवून आणण्यास राष्ट्रीय प्रमाणावर प्रयत्न झाले पाहिजेत. मोठ्या प्रमाणावरील उत्पादनास स्वस्त कच्चा माल, स्वस्त भांडवल पुरवठा, विक्रीच्या सवलती व शास्त्रीय ज्ञानाचा फायदा हीं उपलब्ध होतात, तीं लहान उद्योगधंद्यांनाहि मिळवून दिलीं पाहिजेत. ह्या सर्व गोष्टी घडवून आणण्यास सहकारी संघटनेइतकी सोईची दुसरी संघटना नाहीं. खेडेगावांतील उत्पादनास मोठ्या प्रमाणावरील उपक्रमांस मिळणारा फायदा मिळवून देण्याचें काम सहकारी संस्था करूं शकतील. लोकशाही तत्त्वावर त्यांचा कारभार चालतो, ही गोष्टहि महत्त्वाची आहे.


**दि मागोरा केमिकल कं. लि.,**

**पुणें २.**

अपेक्षेप्रमाणें 'डिपॉझिटस्' आल्यामुळें ता. १५-१-४५ पासून आम्हीं डिपॉझिटस् घेण्याचें बंद केलें आहे.

या बाबतींत जनतेनें दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही आभारी आहोत.

पुणें, ता. १५-१-४५.

रा. व. रानडे, मॅनेजिंग एजंटस्.

## हिंदुस्थानाच्या आर्थिक अभिवृद्धीची योजना

(दुसरा खंड)

सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास प्रभृतींच्या हिंदुस्थानाच्या आर्थिक अभिवृद्धीच्या योजनेचा दुसरा खंड नुकताच प्रसिद्ध झाला आहे. ह्या योजना-पत्रकांत राष्ट्रीय उत्पन्नाची विभागणी व तदनुषंगिक राष्ट्रीय सरकारची भूमिका या प्रश्नांचा विचार करण्यांत आला आहे. अर्थशास्त्राचा अभ्यास नसलेल्या सर्वसामान्य वाचकालाहि सुबोध होईल अशा अत्यंत सुस्पष्ट पण मोजक्या शब्दांत अर्थ-व्यवहारांतील गुंतागुंतीच्या व अवघड विषयांचें सुगम विवेचन ३४ पृष्ठांत सामावलेल्या ४८ परिच्छेदांत केलेलें आहे.

योजना अंमलांत आल्यापासून १५ वर्षांत दर माणशीं उत्पन्न दुपटीचें झालें पाहिजे, रहाणीचें मान वाढलें पाहिजे, हें या आर्थिक नियोजनाचें मुख्य उद्दिष्ट; त्याप्रत जाण्याचे मार्ग व त्याकरितां लागणारी साधनसामुग्री या मूल-प्रश्नांचा विचार, एक वर्षापूर्वी प्रसिद्ध झालेल्या, पहिल्या खंडांत केलेला आहे.

राष्ट्रीय उत्पन्नाची विभागणी योग्य झाली नाहीं तर निव्वळ उत्पादन वाढविल्यानें दारिद्र्याचा प्रश्न सुटतो असें होत नाहीं; याची जाणीव योजनाकारांना असून त्यांनीं त्यांच्या मतानें विभागणी कशी केली असतां योग्य होईल, त्याकरितां आजच्या आर्थिक व्यवस्थेंत कोणते व कसे बदल करावे लागतील, मध्यवर्ती राष्ट्रीय सरकार असणें कां आवश्यक आहे, इत्यादि महत्त्वाचे प्रश्न दुसऱ्या भाग-पत्रकांत त्यांनीं चर्चिले आहेत.

खाजगी प्रयत्न व खाजगी मालकी यांवर आधारलेल्या आजच्या आर्थिक व्यवस्थेंत राष्ट्रीय उत्पन्नाची विभागणी जरी समाधानकारक झालेली नसली तरी इतर कित्येक दृष्टींनीं ही व्यवस्था योजनाकारांच्या मतें अंशतः यशस्वी झालेली आढळते. म्हणून त्यांची सूचना अशी कीं ही आर्थिक व्यवस्था उन्मूलित करूं नये. आपल्याला सुधारणा हवी आहे; आपल्याला शाश्वति, आणि शिस्तवार प्रगति हवी आहे.

### योजनेचे दोन हेतू व त्यांची सिद्धी

ही योजना "उत्पादनवृद्धीची" आहे. "उत्पादनवृद्धी"च्या पोटांत 'योग्य विभागणी'चा समावेश होतो. योजनेचे हेतू दोन आहेत. पहिला, सर्वसाधारण योग्य अशा रहाणीच्या मानांत रहातां येण्याकरितां लागणारें दर माणशीं किमान उत्पन्न मिळविणें; दुसरा, निरनिराळ्या व्यक्ती व वर्ग यांच्या उत्पन्नांतील फाजील विषमता टाळणें.

पहिला हेतु साध्य करावयाचा तर त्याकरितां (१) ज्यामुळें सार्वत्रिक उत्पन्न वाढेल अशी व्यवस्था केली पाहिजे, (२) जीवनाला नित्योपयोगी लागणाऱ्या वस्तू व शिक्षण, आरोग्य इ. वर होणारा वैयक्तिक खर्च कमी झाला पाहिजे.

भरपूर कामकाजाची व्यवस्था, कार्यक्षमतेंत वाढ, शहरी व खेडेगांवी वेतनांत सुधारणा; शेतीच्या मालाच्या किंमतींची स्थिरता, सहकारी संस्थांच्या कार्यक्षेत्रांत वाढ, शेतसारा व जमिनींची मालकी याबाबत सुधारणा इत्यादि केल्यानें उत्पन्न वाढेल. प्राथमिक, मध्यम व प्रौढ शिक्षण, औषधपाणी, वैद्यकीय तपासणी मोफत मिळण्याची व्यवस्था, वीज व वहातुकीचीं साधनें इत्यादि पुरेशीं व शक्य तितक्या कमी खर्चांत मिळाल्यानें रहाणीचा खर्च कमी होईल.

दुसरा हेतू साध्य करावयाचा तर त्याकरितां उत्पन्नावरील कर व वारसावरील कर बसविण्यांत यावेत. तसेंच, जमीनदारी पद्धति बदलून ती रयतवारी करावी. विशेषतः दैनंदिन उपयोगाकरितां लागणाऱ्या वस्तू बनविणाऱ्या लहान व खेडेगांवी उद्योगधंद्यांना शक्यतों वाव द्यावा, कंपन्यांचे शेअर्स शक्य तितक्या अधिक भागीदारांच्या हातांत जाण्यास उत्तेजन द्यावें; उद्योगधंद्यांची प्रादेशिक विभागणी असावी; सहकारी संस्थांत अधिक सुधारणा करण्यांत याव्यात, तसेंच सरकारी मालकीचे आद्य महत्त्वाचे उद्योगधंदे वगैरे सरकारनें चालविले असतां उत्पन्नांतील विषमता कमी होण्यास मदत होईल.

### राष्ट्रीय सरकार व त्याचें कडक नियंत्रण आवश्य

या सर्व योजना प्रत्यक्षांत उतरविण्यासाठी देशांतील प्रमुख राजकीय गटांचें प्रातिनिधिक मध्यवर्ती सरकार आवश्यक आहे. मध्यवर्ती सरकारनें नियंत्रण व एकसूत्रीपणा राहण्याकरितां आवश्यक तेवढे अधिकार स्वतःकडे ठेऊन योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी प्रांतिक व स्थानिक सरकारकडे सोंपवावी. निरनिराळीं नियंत्रणें यशस्वी होण्याकरितां ज्यांत विशिष्ट शिक्षण घेऊन तयार झालेलीं अनुभवी माणसें असतील असें एक स्वतंत्र खातें सरकारला ठेवावें लागेल. तसेंच नियोजन यशस्वी होण्यास ब्रिटिश हिंदुस्थान व हिंदी संस्थानें यांचा एकत्र विचार केल्याविना प्रादेशिक उन्नति होणार नाहीं.

नियोजन म्हटलें म्हणजे त्यांत सरकारी हात नि नियंत्रण आलेंच. योजनाकारांच्या मतें व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारलेली भांडवलशाही व सरकारला सर्वसत्ता देणारा समाजसत्तावाद यांतील तफावत कमी कमी होत असून त्यांच्या ह्या योजनेला दोन्हींचा समन्वय श्रेयस्कर होईल असें त्यांचें मत आहे.

योजना प्रत्यक्ष अंमलांत आणली जात असतांना व ती पुरी झाली असतां अशा दोन भूमिका सरकारच्या आहेत. पहिली भूमिका विशिष्ट कालापुरती असून त्यांत सरकारी नियंत्रण विशेष—आजच्या युद्धमान परिस्थितींत जितकें आहे तितकें—कडक राहील. या नियंत्रणाची व्याप्ति मुख्यतः (१) उत्पादन, (२) विभागणी, (३) उपभोग, (४) पैशाची गुंतवण, (५) परदेशी व्यापार नि हुंडणावळ आणि (६) वेतन व कामाची तरतूद ह्या क्षेत्रांपुरती आहे.

दुसरी भूमिका अधिक महत्त्वाची असून त्यांत आर्थिक व्यवहाराची (१) मालकी (२) नियंत्रण आणि (३) कारभार हीं सरकारी असावींत, त्याचें प्रमाण किती, कसें व कोठें असावें या प्रश्नांचा समावेश होतो.

आंखलेल्या योजना पुऱ्या झाल्या तर हळूहळू समाजांतील विषमता नाहींशी होईल व महत्त्वाच्या व्यापार-धंद्यांचें राष्ट्रीयकरण झालेलें दिसेल असें योजनाकारांचें जागतेपणचें स्वप्न आहे.

## घर भाडेकरू परिषदेची फलश्रुति

लेखक—श्री. ना. तु. ठाकूर, उपाध्यक्ष, पुणें घरभाडेकरू संघ.

पुणें घरभाडेकरू परिषदेचें पहिलें अधिवेशन रविवार ता. २१ जानेवारी रोजीं पुणें नगरपालिकेच्या सभागृहांत मुंबई भाडेकरू संघाचे अध्यक्ष अॅड. एस्. सी. जोशी यांच्या अध्यक्षतेखालीं मोठ्या उत्साहानें पार पडलें. स्थानिक भाडेकरूंना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्याचें, तसेंच त्यांच्या अनेक तक्रारींची दाद लावण्याचें कार्य पुणें घरभाडेकरू संघानें वर्षभर कसोशीनें केलेलें आहे. या जागृतीचें फल म्हणजेच संघातर्फे साजरी झालेली भाडेकरू परिषद होय. पुणें भाडेकरू संघानें आतांपर्यंत शहराचे प्रमुख पेठांतून संघाच्या मासिक सभा घेतल्या, तसेंच निरनिराळ्या पेठांतून सभासद नोंदणीचें, त्याचप्रमाणें भाडेकरूंच्या प्रश्नांची चौकशी करण्याचें कार्य केलें व पांचशेंवर नागरिकांचें या कार्यांत प्रत्यक्ष सहकार्य मिळविलें. पण जाहीर सभांवरील सरकारी नियंत्रणामुळें जनताजनार्दनाच्या वेशीवर भाडेकरूंची गाऱ्हाणीं टांगणें यापूर्वी संघास अवघड झालें होतें. आतां परिषदेच्या निमित्तानें भाडेकरू चळवळीचें लोण सर्व समाजापर्यंत जाऊन पोहोंचलें आहे.

### एका वर्षांतील परिवर्तन

भाडेकरूंचा प्रश्न बहुसंख्य नागरिकांच्या जिव्हाळ्याचा असला तरी विषयाच्या रुक्षतेमुळें तसेंच 'मला काय त्याचें' अशा सर्वसामान्य वृत्तीमुळें या विषयास चालना देण्यास संघाच्या कार्यकारी मंडळास बरेंच श्रम करावे लागले. पण ते प्रयत्न सार्थकी लागले असें या बाबतींत एका वर्षाचे अवधींत घडलेल्या स्थित्यंतरावरून म्हणणें भाग पडेल. वर्षापूर्वी भाडेकरूंची अवस्था 'मुकीं बिचारीं कुणी हाका' अशा स्वरूपाची होती. मुंबई सरकारनें घरभाड्याचा कायदा त्यापूर्वीच करून तो पुण्यास जारी केला होता, पण सामान्य जनतेला त्याची दखलही नव्हती. बहुतेक घरमालकांनीं भाड्यासंबंधींचा कायदा 'स्टँडर्ड किंवा ठराविक' भाड्यांत भरमसाट वाढ करून धाब्यावर बसविलेला होता. रहावयाला जागाच नाहीं तर काय करावयाचें म्हणून भाडेकरूंचे 'अडले नारायण' मालकांच्या हव्या त्या मागण्या मान्य करून त्यांचे पाय धरत अशी स्थिति उत्पन्न झाल्याचें संघाच्या नजरेस आलें. कायदा बव्हंशीं भाडेकरूंना अनुकूल असूनही कित्येक भाडेकरू साधारणतः अज्ञानानें, तर कधीं भांडणांना वैतागून मालकांच्या बेकायदेशीर मागण्यांना मान तुकवीत. राजकीय बाबतींत भारत संरक्षण नियमांची हवी तशी ओढाताण करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांतहि भाडेकरूंच्या बाबतींत त्यांना मिळालेल्या अधिकारांची जाणीव दिसली नाहीं. संघानें प्रथम या बाबतींत पुढाकार घेऊन अधिकाऱ्यांना कायद्यानें मिळालेल्या दंडुक्याचा भाडेकरूंवरील अन्यायाचें परिमार्जन करण्यासाठीं उपयोग करण्यास शिकवलें असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. भाडेकरूंच्या विनंति-तक्रारींना न बधणारे घरमालक कांहीं टेस्ट केसेस होतांच खडबडून जागे झाले व त्यांचेकडून बेकायदेशीर होणाऱ्या कृत्यांना आपोआपच आळा पडूं लागला. संघाकडे घरभाड्यासंबंधीं जी माहिती सभासदांनीं पाठविली आहे त्यावरून असें दिसून येतें कीं कित्येक घरमालकांनीं प्रमाणित भाड्यावर शेंकडा २५ ते ५० टक्के अन्याय्य वाढ केलेली आहे. भाडेकरू 'आंधळा दळतो व कुत्रें पीठ खातें' अशा तऱ्हेनें वागल्यामुळें मालकांना पूर्वी चांगलेंच फावलें, पण संघाच्या खटपटीमुळें भाडेकरूंचे डोळे उघडले व मालकांना बेकायदा केलेली भाडेवाढ पचविणें अवघड होऊं लागलें. संघानें या विषयावर वेळोवेळ ठराव करून जे प्रकार बाहेर आणले त्यामुळें भाडेकरू व घरमालक यांना त्यांचेवरील जबाबदारीचें यथार्थ ज्ञान होण्यास पुष्कळच मदत झाली. भाडेकरू संघाचे अध्यक्ष श्री. श्री. वि. गाडगीळ, वकील यांनीं 'भाडेकरू व घरमालक' हें पुस्तक प्रसिद्ध करून विधायक मार्गानें पुण्यांतील जनतेसाठीं या प्रश्नावर लखलखित प्रकाश पाडला. त्याचा परिणाम इष्ट असाच झाला. संघाच्या वर्षाच्या कार्यानें भाडेकरू परिषदेस योग्य अशी पार्श्वभूमि निर्माण केली होती त्यामुळें परिषद यशस्वी होण्यास विशेष मदत झाली.

### अॅड. जोशी यांचें प्रशंसनीय नेतृत्व

मुंबई-पुण्यासारख्या शहरांतून भाडेकरूंचे होणारे हाल परिषदेचे अध्यक्ष अॅड. जोशी यांनीं स्पष्ट शब्दांत सांगितले. शंभर चौ. फूट जागेंत २·५ इसमांपेक्षा अधिक माणसांना ठेवण्यास तुरुंगांतील नियमाप्रमाणें बंदी आहे. पण मुंबईसारख्या शहरांतून माणसांना यापेक्षा पुष्कळच कमी जागा मिळत आहे हें श्री. जोशी यांचें मत परिस्थितीची गंभीर कल्पना आणून देण्यास पुरेसें आहे. शहरांतील बालमृत्यूंचे उद्बोधक आकडे श्री. जोशी यांनीं आपल्या भाषणाच्या परिशिष्टांत जे मांडले आहेत त्यावरून शहरांच्या वाढत्या लोकसंख्येचे दुष्परिणाम कसे भोगावे लागतात याची कल्पना येईल. प्रचलित घरभाडेकरू कायद्यांत दुरुस्त्या सुचविणारा ठराव करण्यास श्री. जोशी यांच्या नेतृत्वाचा परिषदेस चांगलाच फायदा झाला. घरमालकास भाड्याची पावती देण्यास सक्ती करावी, पावतींत 'स्टँडर्ड' भाडें कोणत्या कलमाप्रमाणें आकारण्यांत आलें याचा स्पष्ट निर्देश असावा, पावतीवर इतर कोणत्याहि अटी मालकानें छापूं नयेत इ. ज्या शिफारशी भाडेकरू परिषदेनें सुचविल्या आहेत त्या न्यायाच्या ठरतील. ठराविक भाड्याखेरीज इतर कोणतीही रक्कम मालक घेईल तर तो दंड वा तुरुंग अशा शिक्षेस पात्र होईल अशीहि दुरुस्ती सुचविली आहे. तसेंच वीज, नळ वगैरे जीवनास आवश्यक सोयी मालकानें तोडल्यास तो गुन्हा समजला जावा असेंहि परिषदेनें सुचविलें आहे. युद्धानंतर भाडेकरू कायद्यास योग्य त्या दुरुस्त्यासह कायम स्वरूप दिलें जावें म्हणून परिषदेनें जो ठराव केला तो निःसंशय दूरदृष्टीचा आहे.

### पुणें नगरपालिकेसाठीं शिफारशी

या परिषदेंत प्रस्तुत लेखकानें पुणें नगरपालिकेला भाडेकरूंच्या अडचणी व सोयी यांकडे जागरूकतेनें लक्ष द्यावें अशी विनंती करणारा ठराव आणला होता त्यावरील चर्चा उद्बोधक झाली. शहराच्या दृष्टीनें घरांची वर्षांतून एकदां तरी रंगसफेती करण्यास मालकांना सक्ती करावी अशी या ठरावांत मागणी करण्यांत आली आहे. याखेरीज अपुरा पाणीपुरवठा, व कांहीं भागांत पाण्याचा दाब नसल्यामुळें होणारे हाल यांकडेहि नगरपालिकेचें लक्ष वेधण्यांत आलें. पुणें नगरपालिका या ठरावाकडे काळजीपूर्वक लक्ष देईल अशी आशा वाटते.

एकंदरीत भाडेकरू परिषदेनें संघटित रीत्या शहरांतील भाडेकरूंच्या मागण्या मांडून मोठीच कामगिरी केली असून तिकडे सरकार आणि नगरपालिका यांनीं तांतडीनें लक्ष देणें अगत्याचें आहे. भाडेकरूंचे नागर जीवन सुसह्य करावें यासाठीं या मागण्या आहेत, घरमालकांना त्रास देण्यासाठीं नव्हेत हें मालकाहि उमगतील तर ते भाडेकरूपरिषदेचे ठरावाशीं सहमत होतील. पण अशी अपेक्षा करणें मानवी स्वभावाला धरून होईल काय?

## आपल्या पुढील कांहीं प्रश्न

श्री. संपादक महाशय 'अर्थ' यांसी

सा. न. वि. वि.

मि. विंडेल विल्की यांची 'एक जग' ही कल्पना मोठी आकर्षक वाटते. वहातुकीचीं साधनें अधिकाधिक वेगवान् होत असल्यानें दोन स्थळांतील अंतर जरी प्रत्यक्ष नाहीं तरी वेळेच्या दृष्टीनें झपाट्यानें कमी होत आहे. तसेंच वैचारिक भूमिकेंतील फरकहि नाहींसा होत आहे. हिंदुस्थानांत इंग्लंडांतून कापड नि यंत्रें येतात; अमेरिकेंतून कागद नि मोटारी येतात; जर्मनींतून रंग नि मौलिक रसायनें येतात; जपानांतून हे सारेच पदार्थ कमाल स्वस्ताईत येतात. आम्हीं स्वतः ते कां तयार करूं नयेत? आपल्याच मंडळींना रोजगार कां पुरवूं नये? इतरांहून आम्हीं कोठें नि किती कमी आहोंत? समतेची नि आत्मविश्वासाची ही जाणीव किती मनोहारी आहे!

स्वसामर्थ्याची जाणीव खरी; पण तीं स्वप्नें प्रत्यक्षांत उतरावयाचीं तर वस्तुस्थितीचें यथार्थ अवलोकन नको कां व्हावयाला? नुकतीच अमेरिकेंत अटलांटिक सिटी येथें आंतरराष्ट्रीय व्यापारी परिषद् झाली. कलकत्त्याचे सिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीचे श्री. गगनविहारी मेहता हे परिषदेला गेलेल्या हिंदी प्रतिनिधींचे उपाध्यक्ष होते. हिंदुस्थानांत परत आल्यावर त्यांनीं एका मुलाखतींत सांगितलें कीं प्रेसिडेंट रूझवेल्ट यांच्या पुढील युद्धोत्तरच्या कपाळशूळ उठवणाऱ्या अनेक प्रश्नांपैकीं सहा कोट बेकारांना नोकऱ्या पुरवणें हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. युद्धजन्य उत्पादन शांतता उत्पादनावर नेणें व त्याचा उठाव करण्याकरितां बाजारपेठा वाढविणें ह्या प्रश्नांचा अमेरिकन सरकार, उद्योगपती, व्यापारी संस्था नि अर्थशास्त्रज्ञ हिरीरीनें विचार करीत आहेत. अमाप पैसा नि माल हातीं असल्यानें आंतरराष्ट्रीय व्यापार अनिर्बंध असावा असे विचाराचे वारे वहात आहेत. परकी सत्तेखालीं जगण्याकरितां झगडणारे लहान-मोठे हिंदी धंदे या झंझावातापुढें टिकतील का?

भविष्यकाळांत हिंदुस्थानाच्या राजकीय दर्जावर त्याचे परराष्ट्रीय व्यापार-संबंध व आर्थिक परिस्थिति अवलंबून राहील असा निर्वाळा श्री. मेहता यांनीं दिला आहे.

लंडनमध्यें स्टर्लिंग शिलका पडून आहेत. त्याबद्दल आपल्याकडे बरीच चर्चा झाली-होत आहे. अमेरिकेंतून यंत्रें वगैरे आणण्याचे विचारहि पुष्कळ बोलले जात आहेत. ह्या खरेदीकरितां हिंदुस्थानाला अमेरिका उधार माल-कर्ज देईल का? या प्रश्नाबाबत सध्या अमेरिकेंत असलेले ईस्टर्न इकॉनमिस्टचे संपादक, डॉ. लोकनाथन् यांनीं दिलेली माहिती, उद्बोधक आहे.

ऋणको राष्ट्रांतील राजकीय वातावरण प्रक्षुब्ध असणार नाहीं आणि अमेरिकन निर्मितींत येणाऱ्या वस्तूंशीं स्पर्धा करणार नाहीं अशा वस्तूंच्या उत्पादनासाठीं फक्त दिलेल्या कर्जाचा उपयोग केला जाईल अशी ऋणको राष्ट्रांनीं खात्री दिल्यानंतर कर्ज देण्याचा प्रश्न विचारांत घेतला जाईल असें अमेरिकन सरकारी अधिकाऱ्यांचें मत असल्याचें डॉ. लोकनाथन् यांना दिसून आलें. राजकीय कारणाकरितां कर्ज देण्याची अमेरिकन सरकारची विचारसरणी असल्याचेंहि त्यांनीं स्पष्ट केलें आहे.

'मुंबई योजने'च्या लेखकांपैकीं एक नि हिंदुस्थान सरकारच्या युद्धोत्तर वाढ आणि नियोजन खात्याचे प्रमुख सर अर्देशिर दलाल यांनीं इंग्लंड-अमेरिकेकडून भांडवली स्वरूपाच्या साहित्य-सामग्री खरीदण्याबाबत पुढील शब्दांत विचार मांडले आहेत.

"यंत्र-सामग्रीकरितां इंग्लंड-अमेरिकेच्या दाराशीं प्रत्येक राष्ट्र आज ठोठावीत आहे. हिंदुस्थानानें यावेळीं उखाळ्या-पाखाळ्या काढूं नये. उद्योगपतींनीं वेळींच विचार करावा. नको असलेली यंत्र सामग्री त्यांच्यावर कोणीच लादणार नाहीं."

युद्धोत्तर 'एक जग' होण्याला आवश्यक तें वातावरण निर्माण करण्याला डॉ. लोकनाथन् यांनीं सुचविलेला मार्ग मला योग्य वाटतो. ते म्हणतात, "हिंदुस्थानांतील आर्थिक नि राजकीय परिस्थितीची अमेरिकेंतील व्यापारी नि सरकार यांना माहिती करून देण्यासाठीं आणि त्याचे अमेरिकेंत काय काय प्रतिध्वनि उठतात हें हिंदुस्थानला कळविण्यासाठीं हिंदी तज्ज्ञ व अर्थशास्त्रज्ञ अमेरिकेंत पाठवावेत." —संजय.

---

### स्टँप ड्यूटीवरील सरचार्ज कमी झाला

१९४३ च्या बाँबे इनक्रीज ऑफ स्टँप ड्यूटीज ॲक्टाच्या परिशिष्टान्वयें कांहीं बाबतींत स्टँप ड्यूटी वाढविण्यांत आली. बिल्स ऑफ एक्सचेंज, चेक, प्रॉमिसरी नोटा, बिल्स ऑफ लेडिंग, लेटर्स ऑफ क्रेडिट विमा पॉलिसी, प्रॉक्झी व पावत्या ह्यांवरील स्टँप ड्यूटींत मात्र फरक करण्यांत आला नाहीं. वरील शेड्यूलमध्यें सांगितलेला सरचार्ज मूळ १८९९ च्या कायद्यांतील ड्यूटीचे मानानें कांहीं ठिकाणीं फारच जास्त आहे असें आढळून आल्यावरून एक नवें परिशिष्ट जुन्याचे जागीं घालण्यांत आलें आहे. त्याचा परिणाम असा आहे, कीं सरचार्जचे दर नव्या परिशिष्टाप्रमाणेंच आकारण्यांत येतील.

सरचार्जचे नवे दर

| स्टँप ड्यूटी | सर चार्जचा दर |
|---|---|
| ( १ ) एक आणा किंवा त्याखालील रुपयाचा भाग | ½ आणा |
| ( २ ) १ आण्यापेक्षा ज्यास्त, २ आण्यांपर्यंत | १ आणा |
| ( ३ ) २ आण्यांपेक्षा ज्यास्त, ४ आण्यांपर्यंत | २ आणे |
| ( ४ ) ४ आण्यांपेक्षा ज्यास्त, ८ आण्यांपर्यंत | ४ आणे |
| ( ५ ) ८ आण्यांपेक्षा ज्यास्त | ६ आणे |
| ( ६ ) सबंद रुपया | ८ आणे |

---

### कॅलेंडरें

किराणा व सुका मेवा ह्यांचे व्यापारी वृ. ना. हेजीब, २० शुक्रवार, पुणें, ह्यांचें इंग्रजी ठळक तारखांचें कॅलेंडर मोठ्या परंतु सुटसुटीत आकाराचें आहे. रिकाम्या जागीं इंग्रजी सोपीं सुभाषितें दिलीं आहेत. प्रत्येक महिन्यास स्वतंत्र पृष्ठ आहे.

दत्तात्रेयाच्या रंगीत चित्रानें व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि., मसालेवाले, मुंबई, ह्यांचें कॅलेंडर विभूषित झालें आहे. चित्राचे दोन्ही बाजूंस उभ्या महिनावार इंग्रजी तारखा आहेत.

पुणें अनाथ विद्यार्थी गृहाचें कॅलेंडर नेहमीप्रमाणें उपयुक्त असून, पंचांगाचीहि सामान्य गरज तें भागवूं शकतें. संस्थेची आठवण सतत करून देण्याचें कार्य त्यामुळें चांगलें होतें.

## सहकारी संस्था म्हणजे माणुसकी व व्यवहार ह्यांचा समन्वय

( लेखकः—श्री. एस. एन. लाठोरे )

भाई माधवराव बागल यांचा तारीख ७-११-४४ च्या ' अखंड भारत ' वृत्तपत्रांत रशियांतील सहकारी संस्था व हिंदुस्थानांतील सहकारी संस्थांचें धोरण यांत तफावत आहे याबाबत जो लेख प्रसिद्ध झाला आहे त्यांत त्यांनीं जे विचार मांडले ते वाचावयास मिळाले. ते म्हणतात—" हिंदुस्थानांतील सहकारी संस्थांचा कारभार पाहातां पत असणाऱ्यालाच पैसा मिळूं शकतो, पण पत म्हणजे केवळ स्वभावाचा चांगुलपणा, इमानिपणा असें इकडे समजलें जात नाहीं; तर त्याची इस्टेट किती, तो पैसा फेडेल कीं नाहीं याचा विचार करून येथील सहकारी संस्था पैसे देत असतात. म्हणजे या संस्था छोट्या छोट्या भांडवलवाल्यांचा एक सहकारी गट असतो एवढेंच.

" खरोखरच ज्याला गरज आहे, ज्याचें पैशावांचून अगदी नडल आहे, ज्यांना घरदार, जमीन, नोकरी व कसलाही आधार नाहीं अशांना म्हणजे खऱ्या गरजवंतांना या इकडील सहकारी संस्था मदत करूं शकत नाहींत. त्यांना सहकारी संस्थांच्या दुकानांतून निव्वळ आंगच्या पतीवर माल मिळूं शकत नाहीं. "

सहकारी चळवळीचा उगम दारिद्र्यांतून झालेला आहे. आपलें दुःख, आपल्या अडचणी, आपल्या गरजा भागवावयाच्या असतील, आपली सुधारणा करावयाची असेल तर ती आपणच केली पाहिजे. हें समजून व " सामर्थ्य आहे चळवळीचें, जो जो करील त्याचें, परंतु तेथें संघटनेचें अधिष्ठान पाहिजे " ह्याप्रमाणें संघटणेनें एकत्र येऊन ही चळवळ इंग्लंड, जर्मनी, आयर्लंड, डेन्मार्क, रशिया, येथें प्रथम जनतेनें सुरू केली व संघटनेच्या द्वारें आपली परिस्थिति सुधारतां येऊन आपली सर्वांगीण उन्नती करतां येते हें सिद्ध केलें,

त्यावरून याच तत्त्वावर ही चळवळ इकडे सुरू केली तर जनतेची परिस्थिति सुधारेल म्हणून ती सरकारनें सुरू केली. कोणत्याहि संस्थेंत तत्त्वें हीं चांगलीं असतातच परंतु तेवढ्यावर भागत नसून त्याला कार्यकर्त्यांची व व्यवहाराची जोड असावी लागते. माझ्या मतें तर सहकारी चळवळ ही लोकशाही स्वराज्याचा पाया आहे. परंतु तीं तत्त्वें ज्या प्रमाणांत जनतेस पटतील त्या प्रमाणांतच चळवळीचा विकास अवलंबून आहे. एकमेकांनीं आपलेपणानें, समतेच्या नात्यानें एकत्र येऊन आपली संघटना करून आपली सर्वांगीण उन्नति करणें हें सहकारी चळवळीचें कार्य आहे. परंतु हें कार्य व हें ध्येय गाठतांना सहकारी चळवळीचा, प्रामाणिकपणा व दानत हा जो प्राण आहे, हें ध्येयनिष्ठ तत्त्व जोंपर्यंत चळवळींतील बहुजनसमाजाच्या अंगीं बाणणार नाहीं तोंपर्यंत ध्येय चांगलें असून चळवळीची उन्नति होणार नाहीं व हें सर्व साध्य होण्यास शिक्षणाची अत्यंत जरूरी आहे. ज्या बहुजन समाजाकरितां ही चळवळ आहे, त्या जनतेकरितां चळवळीचें उपयुक्ततेचें, मार्गदर्शनाचें व माहितीचें वाङ्मय जास्तींत जास्त निर्माण करून त्या द्वारें त्यांना चळवळीची माहिती असणें अत्यंत जरूरीचें आहे. अशा तऱ्हेचें मातृभाषेंतील वाङ्मयही आपल्याकडे तितकेसें निर्माण झालें नाहीं. शिवाय इतर देशांशीं शिक्षणासंबंधीं आपल्या भारत देशाची आज तुलना केली तर इतर ठिकाणीं शेंकडा ५ टक्के निरक्षर नसतील तर आपल्या देशांत १० टक्के पेक्षां जास्त साक्षर आढळणार नाहींत. केवढें हें अंतर आहे बरें ! शिक्षणाच्या दृष्टीनें जो देश पुढें गेला तो सुधारणेच्या दृष्टीनेंही पुढें पाऊल टाकणारच हें उघड आहे.

सहकारी चळवळींत भांडवलापेक्षां माणुसकी, प्रामाणिकपणा-विश्वास व दानत यालाच महत्त्व आहे. कारण भांडवल हें माणुसकी निर्माण करूं शकत नाहीं, तर वरील सद्गुणांच्या द्वारें भांडवल निर्माण होऊं शकतें. रशिया व आपल्या देशांत या चळवळीला भांडवल मिळण्याचें कार्य पाहिलें तर रशियेंत ही जबाबदारी सरकारनें स्वतःवर घेतलेली आहे तर आपल्या देशांत बहुजन समाजानें आपलें भांडवल एकत्र करून तें या चळवळीस पुरविण्याचें कार्य, शहरांतील सहकारी बँका करीत आहेत. ज्या बहुजन समाजानें आपलें भांडवल ज्या संस्थेंत सुरक्षिततेकरितां ठेवलें असेल त्याची जबाबदारी घेऊन त्याचा विनियोग या चळवळीस करतां यावा अशी दुहेरी जबाबदारी या संस्थांवर पडत असल्यामुळें, देण्यांत येणारा पैसा हा वसूल झालाच पाहिजे ही खबरदारी घेणें अत्यंत जरूर आहे.

या देशांत प्रथम सभासदांची मिळकत लक्षांत न घेतां त्यांच्या पतीवर कर्ज देण्यांत येई; परंतु असें कर्ज आपल्या चांगुलपणावर, आपल्या माणुसकीवर, दानतीवर, विश्वासावर दिलें आहे; हा जनतेचा पैसा आहे व तो सुरक्षित ठेवून तो परत करण्याची आपल्यावर जबाबदारी आहे हें तत्त्व सहकारी चळवळींतील बहुजन समाज विसरला व त्यामुळें वसुलीस कांहीं साधन न राहिल्यामुळें बऱ्याच संस्था बुडाल्या व त्याचा परिणाम चळवळीस भोगावा लागला.

समान गरजा असणारे लोक एकत्र येऊन, आपल्या गरजा, एकमेकांच्या पतीवर भागवूं शकतील. अर्थात् एकमेकांनीं एकमेकांचा विश्वास संपादन केलाच पाहिजे. अशा एकत्र येणाऱ्यांच्या पतीचा उपयोग गरीब माणसांस करून घेतां येईल. ज्यानें आपली थोडी पत, थोडा विश्वास निर्माण केला, त्याला ही चळवळ आधार देऊं शकेल, हातभार लावूं शकेल, मदत करूं शकेल. अगदींच निराश्रित माणसाला—ज्याला कसलाही आधार नाहीं, कर्ज परत फेडीन अशी उमेद नाहीं अशाला या चळवळीचे द्वारें आपली सुधारणा करतां येणार नाहीं. हें कार्य भूतदयेनें प्रेरित झालेल्या संस्था अगर लोकप्रिय सरकारच करूं शकेल. मिळकतीवर अर - व्यक्तीची पत अजमावयाची असेल तर सावकार व सहकारी संस्थांत काय फरक आहे, हा भाई बागल यांचा दृष्टिकोन बरोबर आहे; व हें कार्य शिक्षण, आपल्यावरील जबाबदारी ओळखून करणें अत्यंत जरूर आहे. त्या दृष्टीनें शेतकी सोसायट्यांत स्थावर मिळकत गहाण घेऊन पैसे देण्यामुळें, अगर मिळकत पाहून पैशाचा व्यवहार होत असल्यामुळें सभासदांत आपोआपच एकमेकांबद्दल प्रेम व जिव्हाळा न राहातां जे पैसे दिले ते आम्हांस पाहून दिले नसून आमच्या मिळकतीवर दिले आहेत असें वाटेल तर त्यांत माणुसकीला वावच राहात नाहीं व म्हणून मध्यंतरीं मे. भनसाळी साहेब व मे. वैकुंठराय मेहता यांनीं या चळवळींतील खेडगावांच्या पतपेढ्यांची चौकशी करून पोटनियमांतच कर्जें जामिनकीवर द्यावींत व वाटल्यास जादा तारण घ्यावें अशी दुरुस्ती केली. उद्देश हाच कीं, माणुसकी व दानत यापेक्षा मिळकतीला जास्त महत्त्व असूं नये. हें करतांना मात्र ध्येय व व्यवहार या दोन्ही बाबींकडे लक्ष देणें जरूर आहे व म्हणून आपल्या देशांत ही प्रगती हळूहळूच झाली आहे. यास शिक्षणाची सांगड देणें व चळवळीचें वाङ्मय निर्माण करणें जरूर आहे.

## महाळुंग, तालुका माळशिरस, जिल्हा सोलापूर

### सहकारी संस्थेमार्फत झालेली ग्रामीण सुधारणा

ता. १९।१२।४४ रोजीं सायंकाळीं ९ वाजतां मामलेदार मि. शेख यांचे अध्यक्षतेखालीं सभा झाली. आरंभीं मि. अवचट सुपरवायझर हे म्हणाले, "आपले गांवची संस्था सतत "अ" वर्गात असून तिनें लोकांचीं आर्थिक स्थिति सुधारणेबाबत जें कार्य केलें तें प्रसंशनीय आहे. तसेच हल्लीं आपण ग्रामीण सुधारणेबाबत कार्य मोठ्या उत्सुकतेनें करून गांवांतील सर्व रस्ते साफ केलेत, शिक्षणाचे बाबतींत मुलांची संख्या वाढवीत आहांत, गांवाच्या कडेचे रस्ते, कॅनाल भाग असल्यामुळें अत्यंत दलदलीचे होते. हे रस्ते आपण मुरूम टाकून व पाण्याचा निचरा होणेस चर काढून दिलेत. हें आपल्या एकीनें झालें तशीच एकी आपण प्रत्येक सार्वजनिक कामांत करीत गेल्यास आपलें खेडें लौकरच एक नमुनेदार बनेल. याची मला खात्री वाटते."

गांवचे लोकांस धान्य आणणेस अकलुज येथें ७ मैल लांब जावें लागत असे म्हणून सो.नें याबाबत मे. मामलेदार यांना ह्या अडचणी पटवून दिल्यामुळें त्यांनीं गांवास धान्य वाटणीचें सेंटर मिळवून दिलें.

त्यानंतर मि. पाटील रू. डे. इन्स्पेक्टर यांनीं अधिक धान्य पिकविणे बाबत भाषण करून त्याचें महत्व व हल्लींच्या काळांत त्याची किती जरूरी आहे हें पटवून दिलें.

त्यानंतर मि. शेख मामलेदार यांचें भाषण झालें. त्यांनीं गांवांत एकीनें सहकारी सोसायटी "अ" वर्गात असलेबद्दल आनंद व्यक्त केला. "दुसऱ्यावर अवलंबून न राहातां आपण आपलीं कामें एकीनें करीत आहांत आणि कोणाच्याही आर्थिक मदतीची अपेक्षा न करतां हीं कामें करीत आहांत याबद्दल मला हार्दिक आनंद वाटतो" असें ते म्हणाले.

### माळशिरस ता. का. सु. युनिअन

माळशिरस तालुका सोसायट्यांचे सेक्रेटरींना सरकारी गोडाऊन कीपर यांना कंट्रोल जिनसांचे जमाखर्च कसे ठेवावेत, शिकविण्याचा ट्रेनिंग क्लास ता. ७ ते ९ जानेवारी १९४५ अखेर भरविण्यांत आला होता. क्लासचें उद्घाटन मि. शेख (मामलेदार) यांनीं केलें. त्या वेळीं ९ सोसायट्यांचे निवडक सेक्रेटरी व ७ गोडाऊन कीपर हजर होते. आरंभीं मि. अवचट सुपरवायझर यांनीं क्लासचें महत्त्व समजावून सांगितलें त्यानंतर नानासाहेब प्रेसिडेंट यांनीं या क्लासला शिक्षण देण्यांत मुलकी अधिकारी आमचे विनंतीस मान देऊन भाग घेत आहेत हें विशद करून सांगितलें. उत्तरादाखल मे. मामलेदारसाहेब यांनीं भाषण करतांना व्यक्तिशः व्यापाऱ्याकडे कंट्रोल जिनस वांटणी करण्याचे कामापेक्षा सहकारी संस्थांना हें काम मिळालें तर शेतकऱ्यांच्या पैशाचा मोबदला त्यांनीं ग्रामीण सुधारणा करण्याकरितां कसा होईल हें सांगितलें. हल्ली माळशिरस तालुक्यांत धान्यवांटणी, साखर वाटणी, हीं कामें सहकारी संस्थेकडे बऱ्याच मोठ्या प्रमाणांत सोंपविलीं आहेत त्यामुळें संस्थेच्या सेक्रेटरींना पद्धशीर जमाखर्च ठेवतां यावेत याची माहिती जरूर असल्यानें हा क्लास ठेवण्यांत आला. यावेळीं मीं तालुक्यांतील नवीन गोडाउन कीपर यांना माहिती घेण्यांस बोलाविलें आहे असें ते म्हणाले.

सदर क्लासला १६ लोक ३ दिवस शिक्षण घेत होते. मे. मामलेदार सो, मे. कुलकर्णी डि. सुपरवायझर, मि. अवचट सुपरवायझर, मि. देशपांडे, क्लार्क मामलेदार कचेरी, मि. जोशी व मि. माने फेअर प्राईस शाप म्यानेजर अकलूज यांनीं ३ दिवस सतत माहिती दिली.

### "रॉकडेल पायोनिअर्स" शतसांवत्सरिक उत्सव, जळगांव

पूर्व खानदेश डिस्ट्रिक्ट बोर्ड ऑफ सुपरवायझिंग युनियन्स लि. जळगांवच्या एज्युकेशनकमिटीनें "रॉकडेल पायोनिअर्स" शतसांवत्सरिक उत्सवानिमित्त जिल्ह्यांतील सहकारी कार्यकर्त्यांची सभा जळगांव येथें पू. खा. सेंट्रल को. ऑपरेटिव्ह बँकेच्या मिटींग हॉलमध्यें ता. २१-१२-१९४४ रोजीं दुपारीं ५ वाजतां मे. रघुनाथराव ऊर्फ अप्पासाहेब पाटील, प्रेसिडेन्ट जिल्हा लोकलबोर्ड पू. खा. यांचे अध्यक्षतेखालीं भरवून उत्सव साजरा केला. एज्युकेशन कमिटीचे चेअरमन मे. मीरसाहेब यांनीं "रॉकडेल पायोनिअर्स" बाबत संपूर्ण अशी माहिती करून दिली. त्यानंतर अध्यक्षांनीं आपल्या समारोपीय भाषणांत आपल्याकडे सहकारी चळवळ पाहिजे तितकी यशस्वी न होण्याचीं कारणें सांगतांना ती इकडे लोकांच्या स्वयंस्फूर्तीनें निर्माण झालेली नसून सरकारनें सावकार व कर्जदार शेतकरी यांच्यांतील भांडणतंटे शमविण्यासाठी सुरू करण्यांत आली आहे. शिवाय सहकार्याला पोषक असें शिक्षणही दिलें जात नाहीं. सहकारी चळवळ यशस्वी करून दाखवावयाची असेल तर स्वतःचे पायावर उभे राहाण्यास लावणारें शिक्षण लोकांना दिलें पाहिजे. प्राथमिक शाळांमधून सहकारी शिक्षण सुरू करावयास पाहिजे. खेडोपाडीं कन्झुमर्स स्टोअर्स व सोसायट्या निघावयास पाहिजेत इत्यादि गोष्टी सांगून त्यांनीं आपलें भाषण आटोपलें.

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स

गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें.

संस्थापक : कै. नानासाहेब सरपोतदार

पूना गेस्ट हाऊस टेलिफोन नं. ७७१

# —राष्ट्रीय काटकसर—

युद्धकार्याची गरज लक्षांत घेऊन डबे वा कागद यांची बचत करणें भाग आहे. ही पॅकिंग-बाबतची अडचण लक्षांत घेऊन—

# -गोल्डन कोको-

सुटा मिळण्याची सोय सर्व प्रमुख व्यापाऱ्यांकडे करण्यांत येत आहे. सुटा कोको घेण्यानें पैशाचीही बचत होते. मात्र आपणांस गोल्डन कोकोच मिळत आहे अशी खात्री करून घ्या. नांव लक्षांत ठेवा.

**साठे बंधू, "गोल्डन कोको"**

—सर्वत्र मिळतो—

साठे कोको व चॉकोलेट कारखाना, पुणें २.

प्रगतिपथावरील नवा

# मैलाचा — दगड

सन १९४३ अखेर

| | |
|---|---|
| नव्या कामांत | ११० टक्के वाढ |
| चालू कामांत | १०० टक्के वाढ |
| आयुर्विमानिधींत | ८० टक्के वाढ |

— आपला विमा किंवा एजन्सी आजच द्या —

**दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.**

आर. जी. साठे, सुपरिंटेंडेंट — व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे

पहिले व फक्त १ च

गोल्ड मेडॅलिस्ट व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट

**पेन्टर बेडेकर, ए. जी.,**

बुधवार चौक, पुणें २ (सिटी)

बाहेरगांवची कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानी असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

**बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लि.**

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग, ९, बँक हाउस लेन, फोर्ट मुंबई.

टेलिफोन नं. २५४६१ — तारेचा पत्ता 'फार्मर बँक'

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,००,००० |
| काढलेलें भांडवल | रु. १२,२५,००० |
| भरलेलें भांडवल | रु. १२,११,५०० |

खेळतें भांडवल १९४४ जून अखेर ४ कोटी ७३ लक्ष.

……शाखा व उपशाखा……

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | २३ नाशिक ( जि. नाशिक ) |
| २ नीरा " | २४ लासलगांव " |
| ३ सातारा ( जि. सातारा ) | २५ मालेगांव " |
| ४ कऱ्हाड " | २६ नांदगांव " |
| ५ किर्लोस्करवाडी " | २७ घोटी " |
| ६ कोरेगांव " | २८ सटाणा " |
| ७ इस्लामपूर " | २९ येवलें " |
| ८ शिराळें " | ३० धुळें ( जि. पश्चिम खानदेश ) |
| ९ तासगांव " | ३१ दोंडाईचें " |
| १० वाई " | ३२ नंदुरबार " |
| ११ भिवंडी ( जि. ठाणें ) | ३३ साक्री " |
| १२ कल्याण " | ३४ शहादें " |
| १३ पालघर " | ३५ शिरपूर " |
| १४ अकलूज ( जि. सोलापूर ) | ३६ शिंदखेडें " |
| १५ अहमदनगर ( " अहमदनगर ) | ३७ तळोदें " |
| १६ बेलापूर रोड " | ३८ दोहद (जि. भडोच व पंचमहाल) |
| १७ कोपरगांव " | ३९ गोध्रा " |
| १८ पाथर्डी " | ४० झालोद " |
| १९ राहुरी " | ४१ पनवेल ( जि. कुलाबा ) |
| २० शेवगांव " | ४२ नडियाद ( जि. खेडा ) |
| २१ श्रीगोंदें " | ४३ आनंद " |
| २२ विरमगांव (जि. अहमदाबाद ) | |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता, मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७/११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.